संदर्भ : प्रभात आवृत्ती : पुणे दि.१७ डिसेंबर २०१८ पान नं. ५

# 'एमपीएससी' परीक्षेत अनाथांना आरक्षणाचा लाभ

प्रभात वृत्तसेवा

**पुणे, दि. १६** - महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने विविध पदांसाठी घेण्यात येणाऱ्या पूर्वपरीक्षेत मराठा समाजाच्या आरक्षणाची अर्थात 'एसईबीसी'चा समावेश केला. मात्र, अनाथांना एक टक्का आरक्षणाची अंमलबजावणी न केल्याने आयोगाच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह उपस्थित होते. त्याची दखल घेत आता आयोगाने पूर्वपरीक्षेत अनाथांना आरक्षणाचा लाभ घेण्यासाठी ऑनलाईन अर्जप्रणालीत बदल करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे अनाथांना मोठा दिलासा मिळाला आहे.

राज्य सरकारने अनाथांसाठी गेल्या आठवड्यात जाहीर केलेले आरक्षणाची अंमलबजावणी केली नसल्याचे जाहिरातीतून स्पष्ट झाले होते. त्या पार्श्वभूमीवर आयोगावर सर्वत्र टीका होत होती. त्याची दखल घेत आयोगाने सविस्तर परिपत्रक संकेतस्थळावर प्रसिद्ध केले आहे. आयोगाच्या ऑनलाईन अर्जप्रणालीत अनाथ उमेदवारांनी खुल्या वर्गातून अर्ज केले आहेत, त्यांना आता अनाथांसाठी असलेल्या एक टक्का आरक्षणातून अर्ज करण्याची सुविधा उलपब्ध करून दिली आहे. त्यासाठी अनाथ उमेदवारांना अनाथ प्रमाणपत्राचा क्रमांक व दिनांक अर्ज करताना तात्पुरत्या स्वरूपात अर्जात नमूद करावे लागेल. या उमेदवारांना अनाथ प्रमाणपत्र प्राप्त करून घेणे आवश्यक आहे.

## आयोगाच्या संकेतस्थळावर बदल...

खुल्या प्रवर्गातून यापूर्वी नोंदणी केलेल्या उमेदवारांना 'एसईबीसी' प्रवर्गातून आयोगाच्या पूर्वपरीक्षेत अर्ज करताना अडचणी येत असल्याचे निदर्शनास आले. नव्या प्रवर्गाचा समावेश करण्यात आला तरी त्याचा लाभ घेता येत नसल्याची उमेदवारांच्या तक्रारी होत्या. त्या पार्श्वभूमीवर आयोगाने संकेतस्थळावर बदल केले. 'एसईबीसी' प्रवर्गातील उमेदवारांना त्यांची वर्गवारी स्वत:च्या स्तरावर बदलण्याची सुविधा उपलब्ध करून दिली आहे.